दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१६ फेब्रुवारी २०२५




## महाकुंभमेळ्यात पुन्हा भीषण अग्नितांडव; अनेक तंबू जळून खाक !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये गेल्या काही दिवसांपासून महाकुंभमेळा सुरु आहे. या कुंभमेळ्याला देशभरातून लाखो भाविकांनी सहभाग घेतला आहे. महाकुंभमेळ्यात आतापर्यंत लाखो भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. मात्र, कुंभमेळ्यात आग लागल्याच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. आजही पुन्हा एकदा भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. महाकुंभमेळ्यातील सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेत अनेक तंबू जळून खाक झाले आहेत.

महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ आणि १९ मध्ये भीषण आग लागली. या आगीत अनेक तंबू जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. आगीची घटना घडल्यानंतर लगेच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु



आहेत. दरम्यान, आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आगीचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, ही आगीची घटना घडल्यामुळे भाविकांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली असंही सांगण्यात येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

बचाव आणि मदत कार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (छ्ऊठ्ऋ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (ड्ऊठ्ऋ) च्या टीम देखील घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे. तसेच सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, अनेक भाविकांचे साहित्य जळून खाक झाले असल्याचं सांगितलं जात आहे. गेल्या आठवड्यातही महाकुंभमेळ्याच्या सेक्टर १८ मध्येही अशीच आग लागली होती. शंकराचार्य मार्गावरील हरिहरानंद कॅम्पमधील २० हून अधिक तंबूंमध्ये आग पसरली होती. तेव्हाही अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आणि काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं होतं.

**१९ जानेवारीलाही आग लागल्याची घटना घडली होती**

महाकुंभमेळ्याच्या जत्रा परिसरात १९ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास आग लागल्याची एक घटना घडली होती. शास्त्री पुलाजवळ सेक्टर १९ येथील गीता प्रेसच्या कॅम्पमध्ये आग लागली होती. आगीत गीता प्रेसच्या १८० कॉटेज जळून खाक झाल्या होत्या. दरम्यान, त्या आधी महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येच्या दरम्यान चेंगराचेंगरी घटना घडली होती. त्या घटनेत ३० जणांचा मृत्यू झाला होता तर ६० जण जखमी झाल्याचीही घटना घडली होती.

## वक्फ बोर्ड बंद करून सनातन बोर्ड स्थापन करा : नवनीत राणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, अमरावती :** सनातन बोर्डाची सध्या तरी आवश्यकता नाही, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले असताना भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी मात्र वक्फ बोर्ड बंद करून सनातन बोर्ड स्थापन करण्याची मागणी केली आहे. आपण यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मागणी करणार असल्याचे राणा यांनी म्हटले आहे. यावरून येत्या काळात राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत. नवनीत राणा म्हणाल्या, राज्यात लव्ह जिहाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या कायद्याचा खूप मोठा फायदा होईल. या प्रकरणी आजवर अनेक समित्या काम करत होत्या. या प्रकरणी अडचणीत सापडलेल्या अनेक मुलींना आम्ही परत आणले आहे. महाविकास आघाडीच्या काळात आरोपींना सहकार्य मिळत होते. त्यामुळे यासंबंधीचा कायदा आला तर मुलींची कोणतीही फसवणूक होणार नाही. नवनीत राणा यांनी यावेळी वक्फ बोर्ड रद्द करून त्याच्या जागी सनातन बोर्ड स्थापन करण्याचीही मागणी केली. वक्फ बोर्डाने कोट्यवधी रुपयांच्या जमिनी लाटल्या आहेत. त्यामुळे वक्फ बोर्ड रद्द करून त्याच्या जागी सनातन बोर्डाची स्थापना करण्यात यावी. हे बोर्ड भाजपचे सरकार अस्तित्वात असतानाच झाले पाहिजे. मी स्वतः या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहे, असे राणा म्हणाल्या.

**फडणीस काय म्हणाले होते?**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सध्या तरी सनातन बोर्ड स्थापन करण्याची आवश्यकता नसल्याचे म्हटले आहे. फडणवीस म्हणाले होते की, सनातन बोर्डाची सध्या तरी आवश्यकता आहे, असे वाटत नाही. कारण आपली संस्कृती सनातन आहे. सनातनचा अर्थ जी नूतन आहे आणि पुण्यपुरातन आहे. या सगळ्या गोष्टीची व्याख्या अतिशय संकुचित अशी घेतली जाते. मुळात हे सगळे शब्द प्राचीन जीवन पद्धतीला अनुसरून आले आहेत. हा कुठलाही शब्द पूजा पद्धतीशी संबंधित नाही. आमच्या संस्कृतीने एक भारतीय जीवन पद्धती तयार केलेली आहे. ज्या जीवन पद्धतीला हिंदू असे म्हटले आहे.

आता तरी वक्फ बोर्ड आहे, म्हणून सनातन बोर्ड स्थापन करण्याची आवश्यकता नाही, असे फडणवीस यांनी जाहीर केल्यानंतरही नवनीत राणा यांचे हे वक्तव्य आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## ऊसामध्ये सुरु होती अफूची शेती !

### २७ लाख रुपयांची अफूची झाडे ताब्यात...

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१५, कळंब (धाराशिव) :** चक्क उसाच्या फडामध्ये आंतरपीक म्हणून अफूची झाडे लावून अवैद्यरित्या व्यवसाय करत असल्याचा प्रकार शिराढोण पोलिसांनी उघड करून सदरील आरोपीस पकडून व घटनास्थळी जाऊन २७ लाख ७८ हजार रुपयाची अफूची झाडे ताब्यात घेतल्याची घटना दिनांक १४ फेब्रुवारी रोजी खामसवाडी तालुका कळंब येथे गल्ली असून सदरील व्यक्ती विरोधात शिराढोण पोलीस ठाण्यामध्ये दिनांक १५ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे व आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की कळम तालुक्यातील खामसवाडी येथील शेतकरी संभाजी उर्फ बंडू भीमराव हिलकुटे यांनी स्वतःच्या फायद्यासाठी गट नंबर ११९ व १२१ मधील शेतामधील उसामध्ये आंतरपीक म्हणून अफूची झाडे



लावली होती. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला अथवा एनडी पीएस चे कलम ४२ मध्ये केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला जाणीवपूर्वक माहिती न देता स्वतःच्या फायद्यासाठी अफूच्या पिकाची लागवड करून स्वतःच्या शेतामध्ये चोरटा विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीररित्या अफूची झाडाची लागवड केलेली मिळून आली.

सरकारतर्फे फिर्याद जवाब वरून शिवशंकर चोपणे पोलीस उपनिरीक्षक शिराढोण यांच्या फिर्यादीवरून शिरडून पोलीस ठाण्यामध्ये आरोपी संभाजी हिलकुटे यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ३१/२०२५ कलम १५ व १८ एन डी पी एस नुसार दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस अधीक्षक संजय जाधव अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याण नेरकर हे करत आहेत.

## पंढरपुर शहर पोलिसांची उल्लेखनिय कामगीरी

### गांजा विक्री करीता आलेले आरोपी कारसह ताब्यात

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपूर :** पंढरपूर शहर पोलीस ठाणे हददीत दि. १३ फेब्रुवारी रोजी बडीरात बंदोबस्ताचे अनुषंगाने पोलीस अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असताना साधारणतः २२:१५ वा चे सुमारास जुना अकलुज रोड, डी मार्टकडे जाणारे रोडजवळ पेट्रोलींग करीत आले असताना एक इर्टीगा गाडी नं. एमएच ०७ एस ३६९९ संशयास्पद रितीने थांबलेली दिसली. सदर वाहनाची पाहणी केली असता इटिंगा गाडीत पाठीमागे कही खाकी कागदात चिकटपट्टी लावुन गुंडाळलेले ०६ बॉक्स दिसले सदर बॉक्स जवळ जावुन ते हातात घेवुन पाहिले असता त्याचा उग्र वास येवु लागल्याने त्या बॉक्स मध्ये गांजा आहे असे समजले. सदर गाडीमध्ये दोन इसम होते त्यांची नावे रोहन शंकर चव्हाण आणि त्याच्या सोबतच्या रोहित प्रकाश कांबळे दोघे रा. बावडा ता. इंदापुर जि. पुणे असे असल्याचे त्यांनी सांगीतले. त्यानंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया करून त्यांचे विरूध्द एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क) २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई मध्ये एकुण २,४५,४४०/- रु किंमतीचा अंमली पदार्थ गांजा ८,००,०००/- एक पांढरे रंगाची इर्टीगा गाडी नं. एमएच ०७ एस ३६९९ इंजीन नंबर D13A1861604 तसेच चेसीस नंबर MA3FLEBAS00108106 असा असलेली आवाकिअं. असा एकुण १०,४५,४४०/- रू किंमतीचा गांजा व वाहन जप्त करण्यात आले आहे. सदरची कामगीरी ही पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ. अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोलीस उपनिरीक्षक राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, पोहेका ३९६ सुरज हेंबाडे, पोहेका ३९८ सिरमा गोडसे, पोहेका २२१ प्रसाद औटी, पोहेकॉ १७८९ सचिन हेंबाडे, पोहेका १२५५ विठ्ठल विभुते, पोशि १९०४ निलेश कांबळे, पोशि १२१६ शहाजी मंडले, पोशि २१९० समाधान माने, पोशि १५१३ बजिरंग बिचुकले तसेच सायबर पोलीस ठाणे सोलापुर ग्रामीण चे पो शि रतन जाधव यांनी केली आहे.

## थोडक्यात

### ऐरोलीत अतिक्रमण विरोधात धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, ऐरोली (नवी मुंबई) :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. ऐरोली कार्यक्षेत्रातील से-०३ येथील गामी जनरल स्टोअर्स, गाळा नं. ऐ-३३, ऐरोली येथील वाढीव बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(१अ) अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने सदरचे अनधिकृत बांधकाम दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी गॅस कटर, ब्रेकर व मजूर यांचा वापर करण्यात आलेला असून मोहिमे करीता जी विभाग ऐरोली सहा. आयुक्त डॉ. अंकुश जाधव, कनिष्ठ अभियंता संदीप म्हात्रे व इतर अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. सदर कारवाई अंतर्गत दंडात्मक शुल्क रू. १०,०००/- वसूल करण्यात आले आहे.

### शिर्डी शहर आता रात्री ११ नंतर बंद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, शिर्डी :** शिर्डीमध्ये ग्रामस्थांनी ज्या पद्धतीने वाढत्या गुन्हेगारीचा प्रश्न उपस्थित केला, त्यावर प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. रात्री ११ वा. साईबाबांची आरती संपल्यानंतर शिर्डी शहर पूर्णपणे बंद राहील. याची पुढील चार दिवस दवंडी देण्यात येणार आहे. रात्री १२.३० वा. शिर्डी शहरात कोणीही व्यक्ती रस्त्यावर चालताना दिसता तर त्याला विचारणा करून अटक करण्यात येईल. त्या व्यक्तीला दवाखाना किंवा अत्यावश्यक ठिकाणी जाण्याचा पुरावा द्यावा लागेल, अशी माहिती माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी सांगितली. शिर्डी ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्यानंतर पत्रकार परिषदेत डॉ. विखे यांनी सांगितले की, रात्री ११ नंतर शिर्डी पूर्णपणे बंद राहील. याचा परिणाम पुढील दहा दिवसांत शिर्डी शहरात पाहावयास मिळेल. पोलिसांच्या कारवाईला वेग आला आहे. रात्री साडेअकरा वाजता हॉटेल बंदचा निर्णय ग्रामसभेत झाला आहे. बाहेरच्या माणसाने शिर्डी ग्रामस्थांच्या विरोधात जाऊन सल्ला देण्याची आवश्यकता नाही. त्यांचे काहीही ऐकले जाणार नाही. शिर्डीतील रहिवाशांचे आधार, रेशनकार्डची चौकशी करण्यासाठी नगरपरिषद टेंडर काढणार आहे. शिर्डीचे ग्रामस्थ म्हणतील त्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे हे ग्रामस्थांच्या पाठीशी ठाम आहेत. गुन्हेगाराच्या फ्लेक्स बोर्डवर कोणीही फोटो लावल्यास त्याच्यावर देखील कारवाई होणार. मग तो नगरसेवक का असेना त्याला सोडणार नाही. शासकीय जागेवरील सर्व धार्मिक मंदिरांचे ट्रस्ट बरखास्त करण्यात येईल आणि सगळ्या मंदिरांचे एक ट्रस्ट करून उत्पन्नातून शिल्लक राहिलेल्या पैशाचा शिर्डीच्या विकासासाठी वापर व्हावा ही शिर्डी ग्रामस्थांची मागणी होती. ती पूर्ण केली जाणार असल्याचे विखे यांनी सांगितले.

## संपादकीय



### आर.आर.पाटील

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल.

**आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

# सूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवन




मेघनाद साहा हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांनी ऊष्मीय आयनीकरणाचे समीकरण मांडून त्यांचा उपयोग तारकेय वर्णपटांच्या स्पष्टीकरणासाठी केला. खगोल भौतिकीतील या महत्त्वाच्या कार्याकरिता ते प्रसिद्ध आहेत. साहा यांचा जन्म डाक्का जिल्ह्यातील सिओरात्तली आता बांगला देश येथे दि.६ ऑक्टोबर १८९३ रोजी झाला. त्यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रफुलचंद्र रॉय व सर जगदीशचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन सन १९१५मध्ये एमएस्सी आणि नंतर सापेक्षता सिद्धांत व प्रारण दाबाचे मापन या विषयांवर संशोधन करून पीएचडी संपादन केली.

त्यानंतर त्यांनी लंडनच्या इंपिरियल कॉलेजमध्ये संशोधन करून डीएस्सी. पदवी मिळविली. ते कोलकाता विद्यापीठात भौतिकी विषयाचे खैरा प्राध्यापक- १९२१-२३, अलाहाबाद विद्यापीठात भौतिकीचे प्राध्यापक- १९२३-३८, पलित प्राध्यापक- १९३८-५२ आणि गुणश्री प्राध्यापक- १९५२-५६ होते. साहा यांनी आणवीय सिद्धांत आणि पुंजयामिकी यांमधील तत्त्वांचा वापर करून तारकेय वर्णपटांच्या चित्रलिपीचा सांकेतिक अर्थ शोधून काढण्याकरिता सर्वप्रथम प्रयत्न केला. तारकेय वातावरणातील तापमानाला- ६,०००ओसे. किंवा अधिक तार्याचे घटक असलेल्या पुष्कळशा अणूंच्या बाह्य कवचातील इलेक्ट्रॉन छेदले जातात. या आणवीय छेदन प्रक्रियेला इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे आयनीकरण म्हणतात आणि छेदित अणूला आयन-विद्युत्भारित अणू म्हणतात. अशा प्रकारे तारकेय वातावरणात मुक्त इलेक्ट्रॉन आणि छेदित अणू यांचे वायुमय मिश्रण असते. साहा यांनी या मिश्रणास वायूचा गत्यात्मक सिद्धांत आणि ऊष्मागतिकी यांचे नियम लावले.

मेघनाद साहा यांचा जन्म दि.६ ऑक्टोबर १८९३ रोजी बांगलादेशची राजधानी ढाकाजवळील शाओराटोली गावात झाला. मेघनाद साहाच्या वडिलांचे नाव जगन्नाथ साहा होते. आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. त्यांचे वडील जगन्नाथ साहा हे एक छोटे दुकानदार होते. हालाकीची परिस्थिती असल्याने जगन्नाथ यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा खर्च उचलणे कठीण जात होते. यासाठीच प्राथमिक शिक्षणानंतर मेघनाद यांनी दुकानाच्या कामात मदत करावी अशी त्यांची इच्छा होती. मात्र मेघनाद याची इच्छा पुढे शिक्षण घेण्याची होती.


– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप– ९४२३७१४८८३.


त्यांच्या प्रश्नांनी शिक्षकही थक्क होत होते. मेघनाद साहा हे लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. विज्ञान विषयाची त्यांना अधिक आवड होती. वर्गात त्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी शिक्षकही थक्क होत होते. एकदा त्यांनी सूर्याभोवती वर्तुळ आकारात फिरणाऱ्या आवरणाबद्दल विचारले. ज्याचे उत्तर त्यांचे शिक्षक देऊ शकले नाही. त्यावेळी मेघनाद यांनी आपण याचा शोध लावून याची माहिती काढणार असल्याचे शिक्षकांना सांगितले होते. यावरून मेघनाद खूप हुशार असल्याचे शिक्षकांना जाणवले. मात्र त्याचे कुटुंबीय मेघनाद यांना पुढे शिकू देणार की नाही, असा प्रश्न शिक्षकांना पडला. मेघनाद यांचं शिक्षण थांबू नये, असे त्यांना वाटत होते. यानंतर त्यांनी स्वतः मेघनाद यांच्या पालकांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्याचे ठरवले.

याबाबत शिक्षकाने मेघनाद याच्या भावाशी चर्चा केली. मेघनाद यांचा भाऊ त्यांच्या वडिलांकडे गेला आणि म्हणाला, मेघनाद अभ्यासात खूप हुशार आहे. त्याचे शिक्षकही तसे सांगत आहेत. त्याने पुढे शिक्षण घ्यावे, अशी शिक्षकांची इच्छा आहे. यावर वडिलांनी सांगितले की, मेघनाद खूप हुशार आहे. पण त्याला दुसऱ्या गावात शिक्षणासाठी जावे लागेल. ज्यासाठी त्याच्याकडे पैसे नाहीत. याबाबत मदत करण्यासाठी डॉ. अनंत यांच्याशी बोलू, असे मेघनाद यांच्या भावाने वडिलांना सांगितले. त्यांच्या वडिलांनी यावर आपली संमती दर्शवली. डॉ. अनंत कुमार हे एक कुशल आणि प्रभावी डॉक्टर होते. तसेच ते एक चांगले व्यक्ती देखील होते. डॉ.अनंत दास यांनी मेघनाद साहा यांना पुढील शिक्षणासाठी मदत केली. मेघनाद यांनी दुसऱ्या गावातल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला. पुढे ते डॉ.अनंत कुमार यांच्या घरी राहत होते. आपल्या मेहनतीच्या जोरावर मेघनाद साहा यांनी केवळ आपल्या शाळेतच नाही तर संपूर्ण ढाका जिल्ह्यात आठवीत सर्वाधिक मार्क मिळवले. त्यानंतर मेघनाद साहा यांना शिष्यवृत्ती मिळू लागली. सोबतच त्यांना ढाका येथील सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळाला.

याच काळात देशभर स्वातंत्र्यलढ्याची आग धगधगत होती. मेघनाद याशी प्रभावित झाले होते. बंगालचे राज्यपाल त्यांच्या शाळेला भेट देणार होते. राज्यपालांच्या आगमनानिमित्त मेघनाद साहा यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आंदोलनात भाग घेतला. याच्या परिणामी, मेघनाद यांची शिष्यवृत्ती बंद करण्यात आली. मेघनाद यांना त्यांच्या साथीदारांसह शाळेतून काढून टाकण्यात आले. मात्र त्यांना किशोरीलाल ज्युबिली स्कूल या खाजगी शाळेत प्रवेश मिळाला. पुढे साहा हे इंटरमिजिएट परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. नंतर कलकत्ता विद्यापीठात साहा यांनी संपूर्ण विद्यापीठात दुसरा क्रमांक पटकावला. हलाखीच्या परिस्थितीवर मात करत साहा यांची वाटचाल प्रगती आणि विकासाच्या दिशेने सुरू झाली.

कोणत्याही मूलद्रव्याच्या अणुंकरिता छेदन किंवा आयनीभवन केवळ उच्च तापमानामुळे घडून येत नसून ते नीच दाबामुळेसुद्धा घडते, हे साहा यांनी सप्रमाण सिद्ध केले. दाबातील न्यूनीकरणामुळे छेदन झाल्यानंतर उरलेला अणू आणि मुक्त इलेक्ट्रॉन यांची गाठ पडण्याची संधी अधिक कमी होते आणि पुनःसंयोग होण्याचा वेग कमी होऊन आयनीकरण वेग बदलत नाही. साहा यांनी सन १९२०मध्ये सूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवन या विषयावरील एक निबंध फिलॉसॉफिकल मॅगझीनमध्ये प्रसिद्ध केला. रेडिओ तरंगांचे प्रेषण, ज्योतींचे संवहन, प्रज्योत आणि स्फोटक विक्रियांची रचना यांमधील समस्या सोडविण्याकरिता साहा यांचा आयनीभवन सिद्धांत उपयुक्त ठरला आहे. साहा यांनी कोलकाता येथील इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स ही संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

ते या संस्थेचे सन्माननीय संचालक होते. त्यांच्या मृत्यूनंतर या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले. ते लंडनच्या रॉयल सोसायटीचे सन १९२७ साली फेलो होते. सन १९३४मध्ये भारतीय विज्ञान परिषद संस्थेच्या एकविसाव्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. सन १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार म्हणून ते लोकसभेवर निवडून आले होते. आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांनी आपले लक्ष विज्ञानाच्या सामाजिक कार्याकडे वळविले. सन १९३५मध्ये त्यांनी इतिहास, संस्कृती व विज्ञान यांना वाहिलेले सायन्स अँड कल्चर हे नियतकालिक सुरू केले. अशा या महान वैज्ञानिकाचे दि.१६ फेब्रुवारी १९५६ रोजी दिल्ली येथे निधन झाले.

**!! महान शास्त्रज्ञ मेघनादजी साहा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन**

## लीक..

नेते भेटे एक दुजा
बातमी होते लीक
साधे पाणी पिताना
कशी बसली कीक

आपुलकीची बंधने
नाते असे भावनिक
परस्परविरोधी जरी
असू शके जवळीक

अचंबित होती सारे
कशी ही आगळीक
खाजगी आयुष्याला
का नसते मोकळीक

भिन्नपक्ष असे म्हणून
का करुनये सोयरिक
जीवनावरी वैयक्तिक
कॅमेरा नजरा बारीक

असू शकती कुणाचे
रे संबंधव्यावसायिक
घरातली नाती कुणी
का करी सामुदायिक

पाहवेना रे नतद्रष्टांना
सारेचालले ठाकठीक
बेकिंगन्यूज दाखवाय
किती करे झिकझीक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# फाटक्या कपड्यांवर बंदी आणावी !

साधारणत: दोन-अडीच दशकापूर्वी परिधान केलेल्या कपड्याला छिद्र असणे किंवा कुठेतरी थोडेसे फाटलेले असणे असभ्यपणाचे लक्षण मानले जात असे. कपडे परिधान करणार्याला सुद्धा याविषयी लज्जा उत्पन्न होत असे. त्यामुळे कपडे जुने असले, तरी ते कुठे फाटलेले नाहीत ना, याविषयी विशेष सतर्कता घेतली जात असे. त्यामुळे सुई आणि दोरा प्रत्येकाच्या घरी असायचा. सुई दोऱ्यांच्या डब्यात वेगवेगळ्या आकारांच्या सुयांसह वेगवेगळ्या रंगांचे दोरे असत. कपड्याचे बटन निघाले किंवा कुठे जरासे उसवले कि घरातील आई किंवा आजी त्याच दिवशी ते शिवून टाकायच्या. घरात बागडणारे लहान मूल असो वा नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर जाणारा कर्ता पुरुष असो, कपडे जरा कुठे फाटले किंवा उसवले कि ते त्याच दिवशी प्राधान्याने शिवले जात असत. घरातील मुलींच्या आणि महिलांच्या कपड्याच्या बाबतीत तर यासंदर्भात विशेष काळजी घेतली जात असे.

गेल्या काही वर्षांत मात्र भारतात फाटक्या कपड्यांच्या फॅशनने चांगलाच जोर धरला आहे. जीन्स पॅन्ट खरेदी करताना तिच्यावर ठिकठिकाणी छिद्र असलेली(ठळशिव) जीन्स विकत घेण्यामध्ये हल्लीच्या तरुण तरुणींचा कल वाढताना दिसत आहे. पॅन्टनंतर आता जीन्स शर्ट आणि जॅकेट्स सुद्धा छिद्र असलेली. बाजारात मिळू लागली आहेत. तरुणवर्गाकडून अशा फाटक्या कपड्यानाच अधिक पसंती असल्याने समस्त कपड्यांच्या दुकानात आणि ऑनलाईन खरेदीच्या संकेतस्थळांवर हे फाटके कपडे सहजपणे उपलब्ध होऊ लागले आहेत. नेहमीच्या कपड्यांपेक्षा या कपड्यांना अधिक मागणी असल्यामुळे हे फाटके कपडे चढ्या दराने विकले जात आहेत . युथ आयकॉन असलेले सिने कलाकार, खेळाडू हे सुद्धा अशा प्रकारचे फाटके कपडे वापरत असल्याने तरुणांमध्ये या कपड्यांचे विशेष आकर्षण निर्माण झाले आहे. पाश्च्यात्य देशातून आलेल्या या फॅशनचा तरुण तरुणींनी सहजपणे स्वीकार केल्याने फाटके कपडे वापरणे आता सर्वत्र नॉर्मल झाले आहे. ही फॅशन भारतात नव्यानेच आली तेव्हा आरंभी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना, शासकीय आणि खासगी कार्यलयांमध्ये कर्मचाऱ्यांना अशा प्रकारचे फाटके कपडे परिधान करून येण्यास मज्जाव कारण्यात आला होतो आता मात्र ही फॅशन सर्वत्र रुजल्याने अनेक ठिकाणांहून ही बंदी उठवण्यात आली आहे. पाल्यांनी फाटके कपडे परिधान करण्यामध्ये पालकांनाही काही अनुचित वाटत नसल्याने त्यांच्या मागणीनुसार पालकसुद्धा त्यांना असले फाटलेले कपडे आणून देऊ लागले आहेत. असे फाटके कपडे परिधान करणे म्हणजे कुठेतरी आपण सध्याच्या जीवनमानासोबत जात आहोत असे आजच्या तरुणवर्गाला वाटत आहे.

भारतात व्यक्ती स्वातंत्र्य आहे त्यामुळे कोणी कोणते कपडे घालावेत यावर बंधने नसली तरी फॅशनच्या नावाखाली अशा प्रकारे फाटके कपडे घालणे खरंच योग्य आहे का ? फाटक्या जीन्स घालून तरुणी सार्वजनिक ठिकाणी सहजपणे वावरत असतात. या जीन्सवर नको नको त्या ठिकाणी छिद्र पाडलेली असतात. ज्याकडे आंबट शौकिनांचे विशेष लक्ष असते. भारतासारख्या संस्कृतीप्रिय देशात महिलांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक वाढत आहेत हल्लीच्या वेब सिरीज, चित्रपट आणि मालिकांतून खुलेपणाने दाखवली जाणारी प्रणयदृश्ये, यातील तरुण नायिकांचा तोकड्या कपड्यांतील मुक्त वावर, प्रत्येकाच्या हातात असलेल्या मोबाईलमध्ये सहजपणे उपलब्ध होणारे पॉर्न चित्रपट हे जसे या वाढत्या महिला अत्याचाराला कारणीभूत ठरत आहेत तसे तरुणींचा फाटक्या कपड्यांतील सार्वजनिक ठिकाणचा मुक्त वावर हासुद्धा या गोष्टीला खतपाणी घालत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा प्रकारच्या कपड्यांच्या माध्यमातून अंगप्रदर्शन करणे आपल्या सभ्य संस्कृतीला नक्कीच साजेसे नाही. स्पंदनशास्त्रानुसार मोडक्या वस्तू आणि फाटलेले कपडे यांतून प्रचंड प्रमाणात नकारात्मक स्पंदने प्रक्षेपित होत असतात. या वस्तूंचा वापर करणाऱ्याच्या मनावरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो त्यामुळे अशा वस्तू आणि कपडे वापरणे आणि त्या घरात ठेवणे योग्य नसते. त्यामुळेच पूर्वी फुटक्या बशा, मोडकी भांडी तत्परतेने घराबाहेर काढली जात असत. फाटलेले कपडे तत्परतेने शिवले जात असत. काळ बदलला तसा विभक्त कुटुंब पद्धती भारतात प्रचलित होऊ लागली. घरातील आजी आजोबा गावाकडे राहू लागली. कर्ता पुरुष आणि स्त्रिया शहराकडे वळल्या परिणामी पुढच्या पिढीला परंपरागत शास्त्र सांगणारे, काय बरोबर आणि काय चुकीचे सांगणारे घरात कुणीच उरले नाही. त्याचा परिणाम आज आपल्याला घरोघरी दिसत आहे. पाश्च्यात्यांकडून काय घ्यावे आणि काय घेऊ नये याची जाण नसलेली आजची पिढी फॅशनच्या नावाखाली कुठेतरी विकृतीला बळी पडू लागली आहे हे सत्य नाकारून चालणार नाही. सात्विक वेशभूषा कशी असावी याबाबतची सविस्तर माहिती आपल्या ऋषी मुनींनी प्राचीन ग्रंथांतून मांडून ठेवली आहे. त्याचे आचरण आजची पिढी केवळ सण उत्सवांच्या वेळी फोटो सेशनसाठीच करताना दिसते. भारतीय सात्विक वेशभूषेची भुरळ आज विदेशींनाही आहे त्यामुळे पर्यटनासाठी जेव्हा ते भारतात येत्तात तेव्हा येथील वेशभूषा परिधान करतात, येथील प्रथा परंपरा जाणून घेतात, येथील धार्मिक उत्सवांत आणि कार्यक्रमांत सहभागी होतात. आपण मात्र त्यांनी त्यागलेल्या गोष्टी अंगीकारून स्वतःला आधुनिक म्हणवून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. भारतीय संस्कृतीला न शोभणारे असे विकृत कपडे परिधान करून सार्वजनिक ठिकाणी वावरण्यावर खरेतर बंदी आणायला हवी.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मनपाच्या आव्हानात्मक विद्यार्थ्यांच्या स्पर्धा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१५, मुंबई :** शारीरिक परिस्थिती अतिशय आव्हानात्मक असतानाही सकारात्मक मनोबलाच्या जोरावर रणरणत्या उन्हात नॉर्मल विद्यार्थ्यांना ही लाजवेल असा चांगला परफॉर्मन्स देत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आव्हानात्मक विद्यार्थ्यांनी वार्षिक क्रीडा स्पर्धेत सहभागी होत अनेक बक्षिसे जिंकली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, करी रोड मुंबई येथील गोदरेज मैदानावर बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने मनपा शाळांच्या आव्हानात्मक विद्यार्थ्यांच्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी महानगरपालिका आव्हानात्मक शाळांच्या जवळजवळ साडेतीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी (माध्य)सुजाता खरे या उपस्थित होत्या. त्यांच्या समवेत उपशिक्षणाधिकारी अजय वाणी, मुक्तार शहा, अधिक्षक किसन केंकरे, तनुजा उघाडे, शारीरिक शिक्षण विभागाचे वरीष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे, विभाग निरीक्षक रेश्मा लुकतुके यांची विशेष उपस्थिती होती. या स्पर्धां कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी यांच्या उत्तम नियोजनाखाली संपन्न झाल्या. स्पर्धेमध्ये मुलगे आणि मुली यांनी सहभाग घेतला होता. २५, ५०, ७५ आणि १०० मीटर धावणे,खडीखडी लांब उडी,बटाटा शर्यत आणि मेडिसिन बॉल थ्रो आशा विविध प्रकारच्या स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. या सपर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना जरी शारीरिक व्यंग असले तरी त्यांनी अतिशय सुंदर खेळ प्रदर्शन करत 'हम भी कुछ कम नहीं' असे दाखवून दिले. प्रत्येक स्पर्धेत विजयी झालेल्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि मेडल देऊन वरीष्ठ पर्यवेक्षक दत्तू लवटे आणि रेश्मा लुकतुके यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी नाष्टा व जेवणाची ही व्यवस्था करण्यात आली होती. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ पर्यवेक्षक विश्वनाथ गढरी, रेणू निशाणे, किरण इंगळे, रवींद्र पाटील, अंकुशराव बागल, सुरेश भोसले, बाबासाहेब शिंदे,संदीप येंदे, आण्णासाहेब बागल, दुर्गप्रसाद मिश्रा, संपदा जावळे यांच्यासह शारीरिक शिक्षण शिक्षकांनी मेहनत घेतली.

## जीबीएस विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पाण्याचे निर्जंतुकीकरण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, ठाणे :** ग्रामीण भागातील ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी करीत जीबीएस विषाणूंचा तसेच अन्य साथीच्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी पाण्याचे निर्जंतुकीकरण ग्रामपंचायत स्तरावर पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची, वितरण बिंदूच्या (शाळा, अंगणवाडी, घरे इत्यादी) पाणी नमुन्यांची गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवकांमार्फत प्रत्येक महिन्याला एकदा जैविक क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे तपासणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. ग्रामीण भागातील घरगुती व सार्वजनिक स्रोत २ हजार ३६५, ग्रामपंचायत कार्यालय ४३१, शाळा १ हजार २६९, अंगणवाडी केंद्र १ हजार १५२, आरोग्य केंद्र ३३, उपकेंद्र १८० असे एकूण ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी करण्यात येत आहे. ग्रामीण कुटुंबाला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे पुरेशा प्रमाणात किमान ५५ लिटर पाणी प्रतिदिन प्रतिव्यक्ती विहित गुणवत्तेचे पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला घरगुती व सार्वजनिक स्रोत, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्र, उपकेंद्र इत्यादी सातत्यपूर्वक गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कामकाज सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण जनतेला गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाणी गुणवत्ता सह नियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम ग्रामीण भागात गावागावात राबविण्यात यावा याद्वारे गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची व घरगुती नळ कनेक्शन द्वारे पुरवठा करण्यात येणाऱ्या (एफएचटीसी) पाण्याची (किमान दोन नमुने) रासायनिक तपासणी वर्षातून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा प्रयोगशाळेत जमा करण्यात यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जलजीवन मिशन प्रमोद काळे यांनी केले आहे.

## कुंडलवाडीचा विकास होत आहे; पण मुलांना खेळायला मैदानच नाही

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१५, कुंडलवाडी (नांदेड) :** वेगाने विकसित होणारे शहर म्हणून कुंडलवाडीचे नावलौकिक असले तरी या भागातील मुलांना खेळायला एखादे सार्वजनिक मैदान नसल्याची खंत क्रीडाप्रेमी मंडळी व खेळाडूकडून व्यक्त केली जात असून मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण द्या, अशी मागणी होत आहे. मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध करून द्या अशी आर्त हाक लोकप्रतिनिधींना अनेक कार्यक्रमात खेळाडू प्रेमी यांच्या माध्यमातून मनोगतातून होत आहे. कुंडलवाडी शहराचा सर्वांगीण विकास होत असला तरी मैदानाशिवाय हा विकास पूर्ण होऊ शकणार नाही. एक ही मोकळे मैदान नसल्यामुळे मुलांना क्रिकेट व इतर मैदानी खेळ खेळता येत नाही. मैदान नसल्याने मुलांनी मैदानावर खेळायचेच नाही का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. या शहरात द कोरिया येथे धावपटू स्पर्धेत सहभागी होणारे धावपटू योगेश कोंडावर असेल किंवा क्रिकेटमध्ये आपली जादू दाखवणारे श्रीलंका असोसिएशन येथे खेळणारे अखिल लारा असेल किंवा पंजाब असोसिएशन क्रिकेट येथे खेळणारे श्रीनिवास गोनेलवार असेल, किंवा भोपाळ मध्यप्रदेश असोसिएशन येथे खेळणारे बंटी ठक्कुरवार असेल किंवा उत्कृष्ट कबड्डी खेळणारे कबड्डीपटू राहुल गड्डूवार असेल अनेक खेळाडू या भूमीत आहेत. पण मनसोक्त खेळायला मैदानचं नसेल तर येणारी पिढी सशक्त कशी घडणार? याचा विचार राज्यकर्त्यांनी, प्रशासनाने करायला नको का ? असा प्रश्न या निमित्ताने आता उपस्थित होऊ लागला आहे.

## सरशाबाई जयराम वाघमारे यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील पिंपळकौठा चोर येथील ज्येष्ठ महिला कै.सरशाबाई जयराम वाघमारे यांचे शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांचे मृत्यू समयी वय ७० वर्षे होते. त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम अंत्यसंस्कार दि.१६ रोजी रविवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता पिंपळकौठा येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पती, ३ मुलं, एक मुलगी नातवंडे असा मोठा परिवार आहे.दिगांबर वाघमारे यांच्या ते मातोश्री होत.

# फी माफीसह मुलींच्या समस्यांसाठी समिती स्थापन करा

## चंद्रकांत पाटील यांची महाविद्यालयांना सूचना

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१५, पुणे :** महायुती सरकारने घेतलेल्या मुलींच्या फी माफीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्रीचंद्रकांत पाटील 'अॅक्शन मोड'वर आले आहेत. पाटील यांनी शुक्रवारी पुण्यातील गरवारे महाविद्यालयास अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. फी माफीसह मुलींच्या समस्यांसाठी समिती स्थापन करा, या सूचनेसह राज्यातील १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार असल्याचा मानसही पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी उच्चशिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्छाव हे देखील उपस्थित होते. उच्चशिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे; यासाठी राज्य सरकारने व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे



शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती. उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती. या निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा राज्याचे चंद्रकांत पाटील घेण्यास सुरुवात केली आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, उच्चशिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यामुळे मुलींचे उच्चशिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने मुलींचे व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षण पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. मुलींनी देखील ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फी माफीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी.

जेणेकरून मुलींना या निर्णयाचा लाभ घेता येईल. विद्यार्थिनींच्या अडचणी समजून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी, अशी सूचना पाटील यांनी केली.

### १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार

राज्यभरातील १०० महाविद्यालयांना अशा प्रकारे अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफीचा आढावा घेणार आहे. 'कमवा आणि शिका' तत्त्वावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी यावेळी केली असता, त्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी त्यांनी दिली.

# तुळजापुरात एमडी ड्रग्स सह तिघे गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखा व तामलवाडी पोलिसांची संयुक्त कारवाई

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१५, तुळजापूर (धाराशिव) :** तुळजापुरात विक्रीसाठी आणलेले एमडी ड्रग्स स्थानिक गुन्हे शाखा व तामलवाडी पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जप्त करण्यात आले. या कारवाईत तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून १०.७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




या प्रकरणी एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तामलवाडी पोलिसांना अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

त्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सुदर्शन कासार व पथक तुळजापूर उपविभागात गस्त घालत होते. यावेळी गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की काही इसम मुंबईहून तुळजापुरात एमडी ड्रग्स विक्रीसाठी आणणार आहेत. मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तामलवाडी पोलिसांच्या मदतीने सोलापूर-तुळजापूर महामार्गावर गस्त वाढवली.

### टोल नाक्यावर कारवाई

तामलवाडी टोल नाक्याच्या पुढे तुळजापूरच्या दिशेने एक मोटार कार संशयास्पदरीत्या उभी असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पोलिसांनी कारची तपासणी केली असता त्यात तीन इसम आढळले. चौकशी दरम्यान त्यांनी कारमध्ये एमडी अमली पदार्थ असल्याची कबुली दिली. त्यांनी हे ड्रग्स मुंबईहून तुळजापुरात विक्रीसाठी आणल्याचे सांगितले.

### १०.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी तात्काळ पंचनामा करत ५९ पुड्या एमडी ड्रग्स (किंमत २.५० लाख रुपये), गुन्ह्यात वापरलेली मोटार कार आणि मोबाईल असा एकूण १०.७५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ताब्यात घेण्यात आलेले इसम म्हणजे अमित उर्फ चिमू अशोकराव आरगडे व युवराज देविदास दळवी (दोघेही राहणार तुळजापूर) आणि संदीप संजय राठोड (राहणार नळदुर्ग) अशी आहेत.

### पुढील कारवाईसाठी तिघांना पोलिसांच्या ताब्यात

तिघांनाही पुढील कारवाईसाठी तामलवाडी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सुदर्शन कासार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व पथकाची कामगिरी

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सुदर्शन कासार, तामलवाडी पोलीस ठाण्याचे सपोनि गोकुळ ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक लोंढे, पोलीस हवालदार शौकत पठाण, प्रकाश औताडे, फहरान पठाण, जावेद काझी, चालक रत्नदीप डोंगरे, नितीन भोसले तसेच तामलवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार माने, सलगर, सुरनर, चौगुले, चालक शेख यांच्या पथकाने महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# हंगा येथे सोमवारी दिव्यांगांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा; खा. लंकेची संकल्पना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** सी.बी. कोरा ग्रामोद्योग संस्था, खादी ग्रामोद्योग आयोग, भारत सरकारचे सूक्ष्म, लघु मंत्रालय व नीलेश लंके प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि.१७

फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता दिव्यांगांसाठी महारोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत नगर दक्षिणेतील दिव्यांगांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



या कार्यशाळेसाठी खासदार नीलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती लाभाणार असून सूक्ष्म,लघु, मध्यम मंत्रालयाच्या खादी व ग्रामोद्योग आयोगाचे प्रफुल्ल राहणे, जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाचे समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रविण कोरंटीवर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या मार्गदर्शन शिबिरामध्ये ज्या दिव्यांगांना उद्योग व्यवसाय सुरू करायचे आहेत. त्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या कार्यशाळेत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील १८ ते ५५ वयोगटातील सर्व दिव्यांग बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जे दिव्यांग बांधव कार्यशाळेस उपस्थित राहू शकणार नाहीत. त्यांनी त्यांच्या परिवारातील सदस्यांस दिव्यांगांची आवश्यक कागदपत्रे घेऊन उपस्थित राहण्याची मुभा आहे.

# इलेक्ट्रिक घंटागाड्यांचा वापर न करणार्या ग्रामपंचायतींवर होणार कारवाई

## मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांचे ग्रामसेवकांच्या बैठकीत आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** १५ वा वित्त आयोग व नाविण्यपूर्ण योजनेतून घेतलेल्या ई-कचरा संकलन घंटागाड्या एका जागेवर उभ्या ठेवू नका. त्या नादुरूस्त असतील तर दुरूस्त करून घ्या. या गाड्याचे लॉकबुक नियमित भरू ते पूर्ण करून ठेवा. या गाड्यांच्या माध्यमातून गावात नियमित कचरा संकलन सुरू ठेवा, अन्यथा संबंधित ग्रामपंचायतीवर कडक कारवाई करण्याचा इशारा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहेत. जिल्ह्यात दोन वर्षांपूर्वी नाविन्यपूर्ण योजना आणि १४ वा वित्त आयोगाच्या निधीतून घेण्यात आलेल्या ई- कचरा संकलन घंटा गाड्यांची दुरवस्था, त्यांचा वापरासाठी आवश्यक मनुष्यबळ, गाड्यांची देखभाल दुरूस्तीचा खर्च आदी प्रश्नावर छापलेल्या 'सार्वमत'च्या वृत्ताची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी नुकतीच जिल्ह्यातील ग्राम सेवकांची ऑनलाईन आढावा बैठक घेतली.

यावेळी प्रत्येक पंचायत समितीतून गटविकास अधिकारी व ग्रामसेवक या बैठकीला हजर होते. बैठकीत जिल्ह्यातील कचरा संकलन करण्यासाठी घेतलेल्या ई- घंटागाड्यांच्या विषयावर चर्चा झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी जिल्ह्यात ग्रामपंचायतीच्या हद्दीत घनकचरा व्यवस्थापनासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून वितरित करण्यात आलेल्या घंटागाड्या काही ग्रामपंचायतीमध्ये नादुरूस्त व वापरात नसल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच नादुरूस्त घंटागाड्या तात्काळ दुरूस्त करून वापरात आणण्याचे निर्देश यावेळी दिले. जिल्हा परिषदेचे खातेप्रमुखांनी त्यांच्या दर आठवड्याला होणाऱ्या तालुका भेटीदरम्यान नादूरूस्त आढळून येणाऱ्या घंटागाड्या किंवा ग्रामपंचायतीच्या ग्राम विकास अधिकारी अथवा ग्रामसेवक यांनी यात हलगर्जीपणा करत असल्याचे दिसून आल्यास संबंधितावर कारवाई प्रस्तावित करावी. जिल्ह्यातील ग्राम पंचायतींची घरपट्टी व पाणीपट्टी वसुली मार्च अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्याचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना गटविकास अधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत. बैठकीस ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, सामान्य प्रशासनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या समवेत जिल्हा परिषदेचे खातेप्रमुख उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिफल १७ ते २३ फेब्रुवारी २०२५



**मेष रास -** या सप्ताहात तुम्हाला काही शुभ संकेत मिळतील. शुभ वार्ताही समजतील.या सप्ताहात धनवृद्धी देखील होईल. हाती घेतलेल्या प्रत्येक कामात सफलता मिळेल. पारिवारिक स्थिती चांगली असेल. जुनी भांडणे असतील तर ती आता निपटतील .अध्ययनासाठी व धनवृद्धीसाठी हा आठवडा एकदम उत्तम आहे. नवीन नोकरी शोधत असाल तर नक्की मिळेल. प्रमोशन, ट्रान्सफर, पदोन्नती संभवते पण या साप्ताहत खूप मेहनत घ्यावी लागेल.हा काळ खूप चांगला आहे त्याचा सदुपयोग करून घ्या.

**वृषभ रास-** या सप्ताहात तुम्हाला प्रवास संभवतात. तुमच्या कामात, तुमच्या करिअरमध्ये, नोकरीमध्ये, बिझनेस मध्ये ही उत्तम सफलता मि ळेल. लाभ मिळतील पुढे जाल.तुम्हाला घर, गाडी, जमीन खरेदी करण्याचे योग आहेत. धनवृद्धीकारक प्रवासाचे योग देखील आहेत. तुमच्या कामातील अडथळे व आरोग्याच्या कुरबुरी आता समाप्त होतील. आरोग्य हीच संपत्ती आहे हे लक्षात ठेवा.

**मिथुन रास -** या सप्ताहात तुम्ही जर नोकरी करत असाल तर तुम्हाला पदोन्नती संभावते. व तुम्ही जर व्यापार करत असाल तर तुमच्या व्यापारात वृद्धी होईल. परिवर्तन होईल. एखादे मंगल कार्य ठरेल अथवा तुम्ही स्वतः विवाहोच्छुक असाल तर तुमचा विवाह जमेल. तुम्हाला तुमच्या कार्यात तुमच्या परिवाराची साथ मिळेल. परिवारात आनंदी आनंद असेल. विशिष्ट उद्देशाने केलेल्या प्रवासातून नक्कीच लाभ मिळेल.

**कर्क रास -** या सप्ताहात तुम्ही मोठे व लांबचे प्रवास टाळा. फार कष्टदायक ठरू शकतात. त्रास होऊ शकतो. पण तुम्ही करत असलेल्या व्यापारात किंवा नोकरीमध्ये तुम्हाला धनवृद्धी संभवते. परिवारातही आनंदाचे वातावरण असेल. व्यापारात वृद्धी होईल.अभ्यासातही लाभ मिळेल. नोकरीत बदल ही होऊ शकतो.समाजात मानसन्मान वाढेल. स्वास्थ्य ही छान राहील.

**सिंह रास -** या साप्ताहात तुम्हाला सफलता मिळेल. नवीन मित्रा मैत्रिणी भेटतील. हाती घेतलेल्या कार्यात ही यश मिळेल. लाभच होतील. पण बिनकामाचा तणाव घेऊ नका.चिंता करू नका. विवाहोच्छुक असाल तर विवाह जमेल. धंदा नोकरीत सगळे छान असेल.

**कन्या रास -** या सप्ताहात तुम्हाला आरोग्याच्या कुरबुरी जाणवतील.आरोग्य सांभाळा. बिनकामाचे वादविवाद टाळा. अभ्यासात व धनात वृद्धीहोइल.धन, व्यापार नोकरीत यश मिळेल. पारिवारिक संपत्तीतून लाभ होतील.नोकरीत प्रमोशन होईल.वेळ खूप चांगली आहे तिचा सदुपयोग करून घ्या. जेवढी मेहनत तुम्ही कराल तेवढेच त्याचे चांगले फळ तुम्हाला या सप्ताहात मिळेल.

**तुला रास -** या सप्ताहात तुमच्या कार्यात बाधा येऊ शकतात. पण घर, भूमी, वाहन हे खरेदी करण्याचे योग आहेत. या सप्ताहात तुमचे आरोग्य एकदम छान राहणार आहे. अभ्यासात प्रगती होईल तुमच्या कामांमध्ये ही तुमचे प्रमोशन होईल. सप्ताहाच्या शेवटी नशीब तुम्हाला हुलकावणी देण्याचा प्रयत्न करेल तरी सुद्धा तुमची कामे उशिरा का होईना पण पूर्ण होतील.

**वृश्चिक रास -** तुमच्या कार्यात आणि प्रत्येक कार्यात तुम्हाला या सप्ताहात यश मिळेल. तुमच्या कामांमध्ये तुम्हाला अजून अनेक नवीन नवीन अनुभव देखील येतील. पण या सप्ताहात तुम्हाला खूप कष्ट घ्यावे लागतील तुम्ही जेवढे कष्ट घ्याल त्याच्या दुपटीने तुम्हाला फायदा होईल. घर, भूमी, वाहन घेण्याची इच्छा असेल तर तेही घेऊ शकाल. पण वादविवाद कटकटी ही संभवतात.त्या टाळा.

**धनु रास -** या सप्ताहात तुम्ही जरा जास्त धार्मिक व्हाल. पण स्वास्थ्य संबंधित समस्या ही निर्माण होतील स्वतःची काळजी घ्या. अडचणीच्या काळात तुमचा जीवनसाथी तुम्हाला मदत करेल तुम्ही त्याचा सल्ला जरूर घ्या. फायदाच होईल. या सप्ताहात धनवृद्धी ही संभवते.आर्थिक दृष्ट्या काळ चांगला आहे.

**मकर रास -** या सप्ताहात सप्ताहाच्या सुरुवातीलाच तुम्हाला धन लाभाचे योग आहेत. अभ्यासातही प्रगती होईल. महत्त्वाच्या कामातही यश मिळेल. पण तरीही एक प्रकारची हुरहुर तुम्हाला लागलेली असेल. त्यासाठी स्वतःचे मेडिटेशन करून घ्या. सकारात्मक विचार करा शांत रहा.

**कुंभ रास -** या सप्ताहात तुमच्या मानसन्मानात वृद्धी होणार आहे. समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. तुमच्या शब्दाला किंमत मिळेल. धनवृद्धी होईल. आधी चालून आलेली सगळी संकटे आता संपतील. तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टी घडतील. खूप कष्ट करा. सकारात्मक विचार करा. यश मिळेल.

**मीन रास -** या सप्ताहात तुम्हाला नवीन मित्र भेटतील. नवीन जुने सर्व नातेवाईक देखील भेटतील. एखादे छोटेसे गेट-टुगेदरच तुमच्या घरात साजरे होईल. घरात एखादे मंगल कार्य देखील ठरेल. विवाहोच्छुक असाल तर तुमचा विवाह देखील ठरेल. पण तुम्हाला थोडासा पारिवारिक तणाव जाणवेल. परिवारातील लोकांशी थोडे मतभेद देखील होतील. तुमच्या बोलण्याकडे कोणीही लक्ष देणार नाही. पण तुमचं जे लक्ष्य आहे ते तुम्ही मिळवालच. खूप कठीण प्रसंग येतील पण तुम्हाला यश नक्की मिळेल.

**- देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

# नियमाचे उल्लंघन करणारा बारवर; टिळक नगर पोलिसांची धडक कारवाई

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.१४, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्रात डान्स बारवर बंदी असतानाही काही बारमालक नियमांचं उल्लंघन करत असल्याचे सातत्याने समोर येत आहे. अशाच एका प्रकाराला आळा घालत टिळक नगर पोलिसांनी डोंबिवली पूर्व शेलार नाका येथे असलेल्या स्वीट ड्रीम बार /विक्रांत वर शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री १२ वाजता धडक कारवाई केली. टिळक नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुशांत बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक बगाड, पोलीस उपनिरीक्षक अहिरे, महिला पोलीस उपनिरीक्षक पवार व इतर पोलीस अंमलदार पथकाने ही कारवाई केली. बारमध्ये क्षमतेपेक्षा जास्त १८ तरुणी नोकर नाम नसताना आढळून आल्या, तसेच त्या ठिकाणी आनंद लुटणारे मधुंद ग्राहक ही पोलिसांनी ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी बारमध्ये सुरू असलेल्या अवैध गतिविधींचा पर्दाफाश करत संबंधितांवर नवीन २०२३ भारतीय न्याय संहिता कायदा प्रमाणे कायदेशीर कारवाई केली. डोंबिवली परिसरात बार व्यवसायांवर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे हॉटेल, बार चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.




पुढील तपास टिळक नगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बगाड करत असून, अशा प्रकारच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कुमार कदम यांनी सांगितले आहे. सदर कामगिरी पोलीस उपायुक्त परिमंडळ ०३ अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (डोंबिवली) सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुशांत बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक बगाड, पोलीस उपनिरीक्षक अहिरे, महिला पोलीस उपनिरीक्षक पवार व त्यांची अंमलदाराने केली आहेत.

# पळशी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका निलंबित गैरप्रकाराबाबत आमदार दाते यांनी विधानसभेत उठविला आवाज

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील पळशी येथील ग्रामीण भागातील आदिवासी मुला-मुलींसाठी असणाऱ्या निवासी आश्रम शाळेत विविध गैरप्रकार सुरू होते. चाललेल्या या गैरप्रकाराबाबत हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर आ.काशिनाथ दाते यांनी गैरप्रकारांची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली होती. या प्रकरणाविषयी शासनामार्फत समिती स्थापन करून शासनाला अहवाल देण्यात आला.

यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका या दोषी आढळल्याने आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सविता कुंडलिक नागरगोजे यांचे निलंबन करण्यात आले आहे. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत पुढील आदेश येईपर्यंत मुख्याध्यापिका सविता कुंडलिक नागरगोजे यांच्या विरोधात नाशिकचे आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांनी निलंबनाचा बडगा उगारला आहे. मुख्याध्यापिकेचे निलंबित झाल्याने आश्रमशाळा तसेच वसतिगृहांच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

> पळशी येथील आश्रम शाळेतील गैरप्रकारांबाबत हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या त्याच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित करून विद्यार्थ्यांसाठी पाण्याची व्यवस्था, मुलांना खाण्यासाठी आणलेले फळे, पालेभाज्या हे खराब असून मुलांचे आरोग्य धोक्यात असल्याचे सरकारच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकाराबाबत स्थापन केलेल्या समितीकडून सरकारला अहवाल सादर करण्यात आला. यामध्ये मुख्याध्यापिकेने गैरकारभार केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याचबरोबर इतर विभागाचे अधिकाऱ्यांनी कामकाजाविषयी कसूर केल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल.
>
> **-- काशिनाथ दाते, आमदार**

# १४ व्या वृक्षवल्ली २०२५ प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१४, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या १४ व्या 'वृक्षवल्ली २०२५' या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. आज या प्रदर्शनाच्या निमित्ताने विविध झाडे, फळे, फुले, गाय-वासरू अशा सगळ्या गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. सध्या शहरांमध्ये वाढते प्रदूषण आणि हवेची ढासळती गुणवत्ता आपल्याला रोखायची असेल तर पर्यावरण रक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही असे याप्रसंगी नमूद केले. याठिकाणी एक ते दीड एकर जमिनीवर सेंद्रिय भाजीपाला पिकवावा आणि त्याचे प्रात्यक्षिक सर्वसामान्य लोकांना दाखवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. ठाणे महानगरपालिकेने गतवर्षी मुख्यमंत्री हरित ठाणे अभियान राबवून दीड लाख झाडे लावली. ही संख्या यावर्षी २ लाखापर्यंत वाढवावी, असे निर्देश आयुक्तांना दिले. ठाणे शहरात बांबू लागवड अधिक प्रमाणात करावी, असेही यासमयी सुचवले. अधिकाधिक झाडे लावण्यासाठी लोकसहभागाची गरज असून जास्तीत जास्त लोकांना या मोहिमेत सामावून घ्यावे, असेही सांगितले. ठाणे शहरातील जोगीला तलाव बुजवून त्याठिकाणी झोपड्या तयार झाल्या होत्या. आम्ही त्या हटवून तो तलाव पुन्हा पुनरुज्जीवित करत आहोत. ठाणे शहरातील नमो सेंट्रल पार्क मध्येही झाडे वाढवावीत असे याप्रसंगी सुचवले. तसेच शहरात अर्बन फॉरेस्ट तयार करत आहोत, असेही सांगितले.



यावेळी ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, माजी नगरसेविका नम्रता भोसले जाधव, प्रशांत रोडे तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी आणि या प्रदर्शनात सहभागी झालेले शालेय विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

# थोडक्यात

## ईटकुर येथे व्याख्यान करते वसंत हंकारे यांचे व्याख्यान संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, ईटकुर (धाराशिव) :** सध्याचे युग हे सोशल मीडिया मोबाईल, इंटरनेटचे आहे. यामुळे किशोरवयीन मुली व मुलींच्या मनावर विचित्र परिणाम होत आहे. या गोंधळलेल्या स्थितीतून त्यांना सावरण्यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. जेव्हा २४ ते २१ व्या गटातील मुले चांगले विचार आत्मसात करतील तेव्हाच समाजातील चित्र बदललेली आणि अनुचित प्रकार कुठेतरी थांबतील. त्यासाठी व्हॅलेंटाईन डे दिवशी शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते तथा समाज प्रबोधनकार वसंत हंकारे यांचे ईटकुर येथे सार्वजनिक शिव महोत्सव समिती इटकुर यांच्या वतीने विनामूल्य व्याख्यान आयोजित केले होते. आज घरी गेल्यावर आपल्या आई किंवा वडिलांना एकदा कडकडून मिठी मारून बघा, त्यांच्या डोळ्यातून टचकन अश्रूधारा सोडल्याशिवाय राहणार नाही. असे प्रतिपादन व्याख्यानकार वसंत हंकारे यांनी केले ते शिवामहोसव समिती कडून आयोजित न समजलेले आईबाप या आपल्या कार्यक्रमात बोलत होते.प्रत्येक जण लहान असताना आई किंवा कोणीही बाहेर गेले तर बापाची वाट पाहत अंगणात बस थांबायचं आणि बाप आला की त्याला कडकडून मिठी मारत मारत तक्रार करात सांगायचं मात्र कालांतराने आपण जसजसे मोठे झालो तस तसे बापाच्या मायेला दुरावत चाललो होतो. परिणाम लहानपणी आवडणारा आपला सुपर हीरो बाप कधीच विसरलो, आणि मिठी मारणे तर दूर आपण त्यांच्यासोबत दररोज बोलत सुद्धा नाही म्हणून आज एवढे करा घरी गेल्यावर बाप किंवा आईला कडकडून मिठी मारा बघा कसा तुमचा बाप डोळ्यातून पाणी सोडतोय की नाही तर तो पुन्हा तसाच लहानपणीसारखा तुम्हाला विचारेल बाळ बोल काय झाले. असे वसंत हंकारे बोलत होते.

यावेळी बोलताना वसंत हंकारे म्हणाले की, प्रत्येकाच्या आयुष्यात वडीलाचे महत्त्व आणि साधारण आहे. अनेकदा आपण आई विषयी बोलतो तिच्याविषयी प्रेम व्यक्त करतो पण वडिलांविषयी फार व्यक्त करन होत नाही. आई इतकेच प्रेम काळजी जिव्हाळा वडीला मध्येही दिसून येतो अनेक वडीलांना कठोर वागावे लागते. याचा अर्थ हा नाही की ते तुमच्यावर प्रेम करत नाही. अनेक वडील व्यक्त होत नाही आणि आपण सुद्धा त्यांच्याकडे प्रेम व्यक्त करायला घाबरतो आयुष्यात वडिलांचे स्थान खूप मोठे आहे. त्यांच्याकडे आपल्या भावना व्यक्त करणे किंवा प्रेम व्यक्त करणे खूप गरजेचे आहे.

## आदिवासी डोंगराळ भागातील बेरोजगार गरजू महिलेला मदतीचा हात

**अक्षराज : प्रमोद मौळे**



**दि.१५, जव्हार (पालघर) :** शनिवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी अजंता उद्योग समूह व मधु बहुउद्देशीय फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष अजित घोसाळकर व संस्थेमार्फत गरजू महिला भगिनींना शिलाई मशीन मोफत वाटप करण्याचा काम या संस्थेचे अध्यक्ष व त्यांच्या सहकारी परिवारा मार्फत सुरुवात करण्यात आली आहे. या संस्थेने गरीब गरजू आदिवासी महिलांना मशीन वाटप करून एका प्रकारे रोजगार देत मदतीची सुरुवात एका आदिवासी बहुल भाग जव्हार तालुक्यातील घोगऱ्याची मेट या भागातून केली. या संस्थेचे पदाधिकारी स्वतः नाशिक वरून शिलाई मशीन घेऊन आले आणि एका डोंगराळ भागात प्रवास करत त्या गरीब महिलेला घरपोच जाऊन शिलाई मशीन देऊन त्याची मदत करण्यात आली. तसेच पुढील काळात गरीब गरजू बेरोजगार आदिवासी महिलांना शिलाई मशीनच्या स्वरूपात अशीच मदत करू अशी संस्थेचे पदाधिकाऱ्यांनी ग्वाही देखील या ठिकाणी दिली. याप्रसंगी (ज्योतीताई कवर भारतीय जनता पार्टी नाशिक शहर चिटणीस) (रूपालीताई ठाकरे / गावित उपाध्यक्ष अजंता उद्योग समूह) (परमेश्वर खांडेभराड संचालक) पत्रकार विश्वनाथ भोये व ईश्वर मुकणे उपस्थित होते. खरोखर गरजू व गरीब आदिवासी महिलांची मदत केल्याने तालुक्यातील नागरिकांकडून या संस्थेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## एस. एस. क्रिकेट अकॅडमी च्या राज्य व राष्ट्रीय खेळाडूंचा विशेष सत्कार




**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि १५ खडकवासला (पुणे) :** एस.एस.क्रिकेट अकॅडमी च्या १७ व १९ वर्षांखालील क्रिकेट संघाने राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळविले आहे. या संघाना २५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान नेपाळ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. गोव्यातील पेडाम येथे ६ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत २ संघाने सुवर्ण पदक व १ संघाने रौप्य पदक पटकावले. खेळाडूंनी कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, संघाना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला व सर्वात जास्त पदक मिळवण्याचा हि मान मिळविला.

आकाश मिस्कीन यांच्या नेतृत्वाखाली संघांनी दमदार कामगिरी करत यश संपादन केले. १९ वर्षा खालील सुवर्ण पदक प्राप्त व सत्कार मूर्ती **(मुलांचा संघ) :** आर्यन याटकर, सोमेश चनमल, संतोष संगणगारी, भावेश अन्नम, विश्वराज डक्का, महेश टोणपे, पृथ्वीराज गोसावी, अथर्व बिराजदार, विघ्नेश बंदगी, श्रेयस सोलंकर, विश्वास पल्ली, श्रियस गालपेल्ली, श्रीनाथ अन्नम. १९ वर्षा खालील रौप्य पदक प्राप्त व सत्कार मूर्ती (मुलांचा संघ) अथर्व देशमुख, ईश्वरचंद माचेर्ला , वैभव पाटील, सुमितराज मेरगू, महेंद्र मादास, प्रेम भोसले १७ वर्षा खालील सुवर्ण पदक प्राप्त व सत्कार मूर्ती

**(मुलींचा संघ) :** श्रुती चन्ना, अक्षरा कांबळे, प्रियदर्शनी संगणगारी, हर्षदा पाटील, वैभवी जेटगी, अलेक्या भोसले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्रशिक्षक. आकाश मिस्किन, अध्यक्ष संतोष कांबळे, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत बत्तूल, सचिव वैशाली बिराजदार व सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले.